# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.(०२२)२२७९३७५४
doe10.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४७५/ ई-१०
**महसूल व वन विभाग,**
मंत्रालय (मुख्य इमारत), १ ला मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई – ४०० ०३२.
दिनांक : ०६ जानेवारी २०१७

प्रति,
**सर्व जिल्हाधिकारी.**

विषय :- **तलाठी सज्जावरील तलाठ्यांच्या उपस्थितीबाबत.**

महोदय,

जनतेस आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी तलाठी कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. परंतू तलाठी हे कार्यालयात उपस्थित रहात नसल्यामुळे जनतेची गैरसोय होत आहे. जनतेकडून तलाठी कार्यालयांशी संबंधित विविध तक्रारवजा सूचना शासनाकडे प्राप्त होत आहेत. जनतेस आवश्यक त्या सेवा वेळेत उपलब्ध होण्यासाठी कार्यालयामध्ये तलाठी उपस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यास्तव खालील सुचनांचे पालन करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन सर्व तलाठी कार्यालयांना देण्यात याव्यात, ही विनंती.

१) संबंधित तलाठ्यांनी त्यांचा नियोजित दौरा/बैठका याबाबत कार्यालयाच्या आवारात सूचना फलक लावावा.

२) संबंधीत तलाठी यांनी कार्यालयाच्या आवारात तलाठ्यांची कर्तव्ये / जबाबदाऱ्या याबाबत फलक लावावा.

३) तलाठ्यांनी आपला दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक ठळक दिसेल, अशा स्वरुपात कार्यालयाच्या आवारात लावावा, तसेच लगतचे संबंधित मंडळ अधिकारी व नायब तहसिलदार यांचे नांव दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक सुध्दा दर्शविण्यात यावेत.

४) ज्या सज्जांच्या ठिकाणी तलाठी / मंडळ अधिकारी यांना शासनाने निवासस्थाने उपलब्ध करुन दिली आहेत, त्यांनी त्या निवासस्थानामध्ये राहावे.

५) सेवा हमी कायदयाअंतर्गत नमूद सेवा विषयक बाबीची ( विविध प्रकारचे उतारे, लागणारा कालावधी इ.तपशील) माहिती कार्यालयाच्या आवारात लावावी.

६) संबंधित तलाठी यांनी शेतजमीनी, पिकपहाणी करताना संबंधित शेतजमीनीस भेटीबाबतचा तपशील जाहीर करावा.

७) तलाठी कार्यालयामध्ये खाजगी व्यक्तींना कार्यालयीन कामकाजा करिता ठेवू नये, असे करणाऱ्यांविरुध्द शिस्त भंगाची कारवाई करण्यात यावी.

८) विविध दाखले देताना, शासनाने आकारलेले वाजवी शुल्क याबाबतची दरसुची कार्यालयाच्या आवारात लावावी.

आपला,

**( विष्णु ल. पाटील )**
कक्ष अधिकारी